navbharat
Mega Developers

# DHARAVI COMPILED MEDIA REPORT
## 15 Apr, 2025

## Total Mention 14

| Print | Financial | Mainline | Regional | Periodical |
|---|---|---|---|---|
| 9 | N/A | N/A | 9 | N/A |

| Tv | Business | English | Hindi | Regional |
|---|---|---|---|---|
| 1 | N/A | N/A | N/A | 1 |

| Online |
|---|
| 4 |

## Print

| No | Newspaper | Headline | Edition | Pg |
|---|---|---|---|---|
| 1. | Loksatta | Affidavit from those without evidence | Mumbai | 1, 4 |
| 2. | Navakal | Affidavits for verification of upper floor residents in Dharavi | Mumbai | 8 |
| 3. | Navakal | Affidavit for verification of upper floor residents in Dharavi | Pune | 8 |
| 4. | Maharashtra Times | Multipurpose development! | Mumbai | 3 |
| 5. | Nav Rashtra | Ambedkar Jayanti in excitement | Mumbai | 12 |
| 6. | Nav Rashtra | Distribution of 'One notebook, one pen' to students in Dharavi | Mumbai | 12 |
| 7. | Saamana | Dharavikar will unite against Adani | Mumbai | 2 |
| 8. | Sakal | Opposition of Dharavikars to giving affidavit | Mumbai | 1 |
| 9. | Dophar Ka Samana | Conflict will erupt in Dharavi! | Mumbai | 3 |

Loksatta • 15 Apr • Dharavi

# Affidavit from those without evidence

| 1, 4 • PG | 283 • Sqcm | 1109835 • AVE | 784.32K • Cir | Top Left,Top Left |
|---|---|---|---|---|

Mumbai

## पुरावा नसलेल्यांकडून शपथपत्र

**मुंबई :** धारावी पुनर्विकास प्रकल्पाअंतर्गत धारावीतील वरच्या मजल्यावरील रहिवाशांचेही पुनर्वसन करण्यात येणार आहे. त्यांची पात्रता निश्चिती करणे आवश्यक असून वरच्या मजल्यावरील रहिवाशांकडे वास्तव्याचा कोणताही पुरावा नसल्यास एक व्यावहारिक पर्याय म्हणून शपथपत्रे घेतली जातील. वृत्त...४

# पुरावा नसलेल्यांकडून शपथपत्र

## धारावी पुनर्वसन प्रकल्पातील वरच्या मजल्यावरील रहिवाशांची पडताळणी

लोकसत्ता प्रतिनिधी

**मुंबई** : धारावी पुनर्विकास प्रकल्पाअंतर्गत धारावीतील वरच्या मजल्यावरील रहिवाशांचेही पुनर्वसन करण्यात येणार आहे. त्यांची पात्रता निश्चिती करणे आवश्यक असून वरच्या मजल्यावरील रहिवाशांकडे वास्तव्याचा कोणताही पुरावा नसल्यास एक व्यावहारिक पर्याय म्हणून शपथपत्रे घेतली जाणार आहेत, अशी माहिती धारावी पुनर्वसन प्रकल्पाकडून (डीआरपी) देण्यात आली.

वरच्या मजल्यांवरील रहिवाशांकडून जबरदस्तीने शपथपत्रे घेतली जात असल्याच्या आरोपाच्या पार्श्वभूमीवर डीआरपीने हे स्पष्टीकरण दिले आहे. भाडेतत्त्वावरील गृहप्रकल्पाअंतर्गत राज्य सरकारने पहिल्यांदाच धारावी पुनर्विकास प्रकल्पाअंतर्गत झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील अपात्र अर्थात वरच्या मजल्यांवरील रहिवाशांनाही घरे देण्याचा निर्णय घेतला. फरक इतकाच की या रहिवाशांना धारावीत नव्हे तर धारावीबाहेर घरे दिली जाणार आहेत. यासाठी डीआरपीला धारावीबाहेर मोठ्या प्रमाणावर जागाही दिली जात आहे.



### ‘जबरदस्तीने शपथपत्रे घेतली जात नाही’

शासन निर्णयानुसार, शपथपत्रे घेण्याची कार्यवाही सर्वेक्षणादरम्यान वरच्या मजल्यावरील अनेक जणांकडे वास्तव्याचा कोणताही पुरावा नाही, त्यामुळे शपथपत्रे घेण्यास डीआरपीने सुरुवात केली आहे. मात्र ही शपथपत्रे जबरदस्तीने घेतले जात असल्याचा आरोप केला जात आहे. त्यामुळे रहिवाशांमध्ये संभ्रम असून धारावीत गोंधळाचे वातावरण आहे. ही बाब लक्षात घेत कुठेही जबरदस्तीने शपथपत्रे घेतली जात नसल्याचे स्पष्टीकरण देण्यात आले आहे.

या रहिवाशांना भाडेतत्त्वावरील गृहप्रकल्पामध्ये समाविष्ट करून घेण्यात येणार असून ३०० चौ. फुटाची घरे दिली जाणार आहेत. १२ वर्षांसाठी रहिवाशांना ठरावीक असे घरभाडे भरावे लागेल आणि त्यानंतर मात्र त्या घराची मालकी रहिवाशाला दिली जाणार आहे.

तेव्हा अपात्र रहिवाशांच्या या पुनर्वसनासाठी त्यांचीही पात्रता निश्चिती करणे आवश्यक असल्याने डीआरपीकडून सुरू असलेल्या सर्वेक्षणाअंतर्गत वरच्या मजल्यावरील रहिवाशांचेही सर्वेक्षण करण्यात येत आहे.

पुरावा नसल्याने कोणीही घराच्या हक्कापासून वंचित राहू नये, यासाठी शपथपत्रे घेतली जात असून हा केवळ एक व्यावहारिक पर्याय असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.

शासन निर्णयानुसार, रहिवाशांकडे वीजदेयक, नोंदणीकृत विक्री किंवा भाडेकरार, आधारकार्ड, रेशन कार्ड, मजला क्रमांक नमूद असलेला पासपोर्ट किंवा तळमजल्यावरील पात्र रहिवाशांने प्रमाणित केलेली शपथपत्रे यापैकी एक कागदपत्र असणे आवश्यक आहे. त्यानुसारच शपथपत्रे घेतली जात असल्याचेही धारावी पुनर्वसन प्रकल्पाने म्हटले आहे.

The Dharavi Redevelopment Project clarified that upper-floor residents without proof of residence can submit affidavits for eligibility. Allegations of forced affidavits were denied. These residents will be relocated outside Dharavi with rental housing for three years, after which ownership is transferred. Surveys are ongoing to include all eligible occupants.

Navakal • 15 Apr • Dharavi

# Affidavits for verification of upper floor residents in Dharavi

| 8 • PG | 72 • Sqcm | 36018 • AVE | 273.62K • Cir | Middle Right |
|---|---|---|---|---|

Mumbai

# धारावीतील वरच्या मजल्यावरील रहिवासी पडताळणीसाठी शपथपत्रे

■ मुंबई

**धारावीच्या** सर्वेक्षणांतर्गत वरच्या मजल्यावरील रहिवाशांकडे वास्तव्याचा कोणताही पुरावा नसल्यास एक व्यावहारिक पर्याय म्हणून शपथपत्र घेतले जाणार आहे. ही माहिती धारावी पुनर्वसन प्रकल्पाने (डीआरपी) दिली आहे. वरच्या मजल्यांवरील रहिवाशांकडून जबरदस्तीने शपथपत्र घेतली जात असल्याच्या आरोपाच्या पार्श्वभूमीवर डीआरपीने हे स्पष्टीकरण दिले आहे.

ही शपथपत्रे घेतल्याने धारावीतील रहिवाशांमध्ये चिंता आणि गोंधळाचे वातावरण पसरले होते. वरच्या मजल्यावरील बहुतेक रहिवाशांकडे त्यांचे निवासस्थान सिद्ध करण्यासाठी अधिकृत नोंद नाही. त्यामुळे जीआरमध्ये नमूद केल्याप्रमाणे प्रतिज्ञापत्र हा एक पर्याय आहे, असे डीआरपीने म्हटले आहे. जीआरद्वारे शपथपत्रे गोळा करून वरच्या मजल्यावर राहणाऱ्यांना धारावीबाहेर पुनर्वसनासाठी पात्रता सिद्ध करण्याची संधी आहे.

The Dharavi Redevelopment Project (DRP) stated that upper-floor residents without official proof can submit affidavits as per government rules. This aims to reduce confusion and ensure eligibility for rehabilitation. DRP denied allegations of forced affidavits, clarifying it's a practical solution for those lacking residence documents during the survey.

Navakal • 15 Apr • Dharavi

## Affidavit for verification of upper floor residents in Dharavi

| 8 • PG | 60 • Sqcm | 6050 • AVE | N/A • Cir | Middle Center |
|---|---|---|---|---|

Pune

# धारावीतील वरच्या मजल्यावरील रहिवासी पडताळणीसाठी शपथपत्रे

■ मुंबई

धारावीच्या सर्वेक्षणांतर्गत वरच्या मजल्यावरील रहिवाशांकडे वास्तव्याचा कोणताही पुरावा नसल्यास एक व्यावहारिक पर्याय म्हणून शपथपत्र घेतले जाणार आहे. ही माहिती धारावी पुनर्वसन प्रकल्पाने (डीआरपी) दिली आहे. वरच्या मजल्यांवरील रहिवाशांकडून जबरदस्तीने शपथपत्र घेतली जात असल्याच्या आरोपाच्या पार्श्वभूमीवर डीआरपीने हे स्पष्टीकरण दिले आहे.

ही शपथपत्रे घेतल्याने धारावीतील रहिवाशांमध्ये चिंता आणि गोंधळाचे वातावरण पसरले होते. वरच्या मजल्यावरील बहुतेक रहिवाशांकडे त्यांचे निवासस्थान सिद्ध करण्यासाठी अधिकृत नोंद नाही. त्यामुळे जीआरमध्ये नमूद केल्याप्रमाणे प्रतिज्ञापत्र हा एक पर्याय आहे, असे डीआरपीने म्हटले आहे. जीआरद्वारे शपथपत्रे गोळा करून वरच्या मजल्यावर राहणाऱ्यांना धारावीबाहेर पुनर्वसनासाठी पात्रता सिद्ध करण्याची संधी आहे.

The article discusses the Dharavi rehabilitation project's clarification regarding the affidavit process for upper-floor residents in Dharavi who lack official records of residence, aiming to address confusion and anxiety among residents about their rehabilitation eligibility.

Maharashtra Times • 15 Apr • Dharavi

## Multipurpose development!


| 3 • PG | 912 • Sqcm | 2075849 • AVE | 1.3M • Cir | Middle Left |
|---|---|---|---|---|

Mumbai

# बहुउद्देशीय विकास!

## धारावी पुनर्विकास प्रकल्पाचा मास्टर प्लॅन तयार

- कार्बन उत्सर्जन कमी करण्यावर भर
- रहिवाशांना आरोग्य, क्रीडा, विरंगुळ्याच्या सुविधा
- आराखडा लवकरच प्रसिद्ध होणार



### एकात्मिक नियोजन केंद्रस्थानी

धारावीतील विविध समाजघटकांच्या रहिवासांचे पुनर्वसन या प्रमुख आव्हानांसाठी एकात्मिक नियोजनाचे सूत्र अंमलात आणले जाणार आहे. या सर्व विविध समुदायातील रहिवाशांची ओळख टिकवून राहतानाच सर्व समुदायांचे पुनर्वसन होण्यासाठी एकात्मिक नियोजन केंद्रस्थानी ठेवण्यात आले आहे. धारावी अधिसूचित क्षेत्रात (डीएनए) जवळच्या सार्वजनिक वाहतूक सेवांपर्यंतचा अपेक्षित प्रवास वेळही कमी केला जाण्यावर लक्ष देण्यात येणार आहे. रहिवाशांना हाकेच्या अंतरावर आवश्यक सेवासुविधा मिळतानाच दैनंदिन प्रवास वेळ कमी करण्यासाठी प्रयत्न असल्याचे सांगितले जाते.

**हेमंत साटम**
hemant.satam@timesofinida.com

**मुंबई :** धारावी पुनर्विकास प्रकल्पाचा प्रस्तावित बृहद् आराखडा हा सर्वसमावेशक, चालण्यायोग्य उत्तम परिसर, एकात्मिक-बहुउद्देशीय विकास आणि हवामान बदलांना तोंड देण्यास सक्षम ठरणार आहे. राज्य सरकारकडून धारावी पुनर्विकास प्रकल्पाचा मास्टरप्लॅन लवकरच प्रसिद्ध केला जाणार असल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे. विशेष म्हणजे हा प्रकल्प हरित संकल्पनेवर भर देणारा असून संपूर्ण प्रकल्पात कार्बन उत्सर्जन कमी करण्यावर प्रामुख्याने भर दिला जाणार आहे.

धारावी पुनर्विकास प्रकल्प हा पथदर्शी ठरतानाच भविष्यवेधी ठरण्याच्या दृष्टीने मास्टर प्लॅनमध्ये नियोजन केले आहे. हा पुनर्विकास प्रकल्प निवासी क्षेत्र म्हणून विकसित करताना त्यात रहिवाशांना पुरेशा आरोग्य, क्रीडा, मनोरंजन-विरंगुळ्याच्या सुविधा पुरवल्या जाणार आहेत. मुंबईत पावसाळ्यात सखल भागात दरवर्षी पूर येतो, त्यात धारावीचाही समावेश असतो. ही बाब लक्षात घेताना मास्टरप्लॅनमध्ये त्याचा विचार केला आहे. धारावी अधिसूचित क्षेत्रात (डीएनए) विशेषरित्या आरेखन केलेल्या पाण्याचा वेगवान निचरा करणाऱ्या भागांसह महत्त्वाच्या ठिकाणी असणाऱ्या हरित क्षेत्रांचा समावेश आहे. महत्त्वाचे म्हणजे ही हरित क्षेत्र हवामान बदलांसह, मान्सूनशी निगडित आव्हानांना सक्षमरित्या तोंड देण्यास सहाय्यभूत राहतील, असे सूत्रांचे म्हणणे आहे.

**शाश्वत विकासाकडे कल**

धारावी पुनर्विकास प्रकल्पात कार्बन उत्सर्जन कमी करण्यावर भर दिला जाणार आहे. जगातील इतर शहरांप्रमाणेच या ठिकाणी चालण्यासाठी पुरेशी जागा उपलब्ध होईल, असे पाहिले जाईल. त्यासोबत सायकलचा वापरही अधिक होण्यासाठी पूरक वातावरण राहील. संपूर्ण प्रकल्पात शाश्वत, हरित परिसर निर्माण करण्यासाठी अनुकूल वातावरण असेल. रहिवाशांना चालण्यासाठी मुबलक जागा, सायकल चालविणाऱ्यांसाठी सुरक्षित रस्ते, वाहनांचा वापर कमी होईल, अशा रितीने रचना असेल, असे सूत्रांचे म्हणणे आहे.

**हरित क्षेत्र आणि सामाजिक बंधांसाठी उपयुक्त**

प्रकल्पात घर किंवा नोकरी-व्यवसायाच्या ठिकाणांपासून काही मिनिटांच्या अंतरावर हरित क्षेत्र, उद्याने उपलब्ध असतील. हरित क्षेत्रांची वानवा दूर करून डीएनएमध्ये छोटी हरित क्षेत्र विकसित करण्यात येतील. या क्षेत्रांपर्यंत पोहोचण्यासाठी रहिवाशांना पाच मिनिटांपेक्षा अधिक चालावे लागणार नाही, हे पाहिले जाईल. आंतराष्ट्रीय स्तरावरील शहर नियोजनासाठी आधारभूत असणाऱ्या घटकांनुसार इथे सुविधा दिल्या जातील. मुंबईसह धारावीत हरित क्षेत्रांची कमतरता लक्षात घेता ही हरित क्षेत्र सामाजिक जडणघडणीसाठी पोषक ठरतील, अशी भूमिका त्यामागे आहे.

The Dharavi Redevelopment Project's upcoming master plan focuses on sustainable, climate-resilient development with green spaces, reduced carbon emissions, and better drainage. It includes safe roads, cycling paths, and easy access to parks and public services. The plan aims to improve living conditions while preserving community identity and reducing travel time.

Nav Rashtra • 15 Apr • Dharavi

## Ambedkar Jayanti in excitement

| 12 • PG | 113 • Sqcm | 186114 • AVE | 500.5K • Cir | Middle Right |
|---|---|---|---|---|

Mumbai

उत्साह ● धारावीत झेंडा ग्रुप कार्यकारी मंडळातर्फे कार्यक्रम

# आंबेडकर जयंती उत्साहात

मुंबई, (वा.) भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती धारावी शिवशक्ती नगर, बगीचा समोर, संत कक्कया मार्ग येथे झेंडा ग्रुप कार्यकारी मंडळाच्या वतीने मोठ्या उत्साहात आणि अभिमानपूर्वक साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ११ वाजता छत्रपती शिवाजी महाराज आणि संविधान निर्माता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून झाली. मंडळाचे अध्यक्ष कचरू सदाफुले यांच्या हस्ते अभिवादन करण्यात आले. यानंतर विभागातील रहिवासी आणि कार्यकर्त्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती लक्षात घेऊन प्रतीकात्मक १३४ लाडूंचे वाटप करण्यात आले.



### फुले-शाहू-आंबेडकरांचे विचार पुढे नेण्याचा संकल्प

कार्यक्रमात संदीप सोनवणे, महादेव सोनवणे, किसन नारायण, दिलीप गाडेकर, गंगा जोगदंडकर, परशुराम जाधव, सूर्यकांत सोनवणे यांच्यासह अनेक मान्यवर आणि स्थानिक नागरिकांनी उपस्थित राहून सामूहिक अभिवादन केले. कार्यक्रमाच्या सांगताच झेंडा ग्रुप कार्यकारी मंडळातर्फे फुले-शाहू-आंबेडकर यांच्या विचारांना पुढे नेत, अशा सामाजिक व प्रेरणादायी कार्यक्रमांचे आयोजन नियमितपणे करण्याचा संकल्प करण्यात आला.

the zenda group executive board celebrated dr. babasaheb ambedkar's 8th birth anniversary in mumbai with a wreath-laying ceremony and distribution of symbols to residents and activists, reflecting the group’s commitment to social causes.

Nav Rashtra • 15 Apr • Dharavi

## Distribution of 'One notebook, one pen' to students in Dharavi

| 12 • PG | 104 • Sqcm | 171700 • AVE | 500.5K • Cir | Top Right |
|---|---|---|---|---|

Mumbai

# धारावीत विद्यार्थ्यांना 'एक वही, एक पेन' वाटप

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त उपक्रम





मुंबई , (वा.) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त हराळे सेवा संघातर्फे समाज मंदिर सभागृह, धारावी येथे एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. दुपारी १२.३० ते २ या वेळेत पार पडलेल्या या कार्यक्रमात 'एक वही, एक पेन' उपक्रमांतर्गत विभागातील शालेय विद्यार्थ्यांना वही आणि पेन वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्यार्थ्यांनी डॉ. आंबेडकर यांच्या विचारांवर मनोगत व्यक्त करून त्यांना आदरांजली अर्पण केली. यानंतर सुनील पवार, दिलीप गाडेकर आणि अनुसया माने यांनी डॉ. आंबेडकरांची चळवळ, त्यांच्या समाजहितकारक कार्याचा आढावा घेतला व चर्मकार समाजाच्या उन्नतीबाबत मार्गदर्शन केले. या उपक्रमात विभागातील महिलांचा उत्स्फूर्त सहभाग दिसून आला. तसेच अनेक तरुण मंडळी, ज्येष्ठ नागरिक आणि विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शंकर बळी, विशाल कारंडे, दिलीप गाडेकर, किशोर जाधव, आरती माने, अलका साबळे आणि सरिता शेरखाने यांचे मोलाचे योगदान लाभले. कार्यक्रमाच्या समारोपाला सर्व उपस्थितांना चॉकलेट वाटप करण्यात आले. शंकर बळी यांनी सर्व सहभागींचे मनःपूर्वक आभार मानले.

on ambedkar's birth anniversary, harale seva sangh organized a program in dharavi to honor his legacy by distributing books and pens to students. several participants including shankar bali expressed their respect for ambedkar's contributions towards social upliftment. the event also highlighted the involvement of women, young people, senior citizens, and students.

Saamana • 15 Apr • Dharavi

Dharavikar will unite against Adani

| 2 • PG | 746 • Sqcm | 442864 • AVE | 910K • Cir | Bottom Right |
|---|---|---|---|---|

Mumbai

# अदानीविरोधात धारावीकर एकवटणार

## शिवराज मैदानावर २० एप्रिलला जनसभा

मुंबई, दि. १४ (प्रतिनिधी) – धारावी पुनर्विकास प्रकल्पाच्या नावाखाली वर्षानुवर्षे राहत असलेल्या धारावीकरांना अपात्र करून मुंबईबाहेर फेकण्याचा कट केंद्र, राज्यातील भाजप आणि अदानी समूहाची एनएमपीडीए कंपनी करत आहे. मात्र, धारावीकर कोणाच्याही दबावाला बळी पडणार नाहीत. धारावीकरांमध्ये जनजागृती करण्याचे काम सुरूच राहणार असून रविवार, २० एप्रिलला धारावीत विशाल जनसभेचे आयोजन करण्यात आले आहे. धारावी बचाव आंदोलन समितीने क्रॉस रोडवरील शिवराज मैदानात संध्याकाळी ही सभा आयोजित केली आहे.

धारावीकरांना विश्वासात न घेता, त्यांच्या मनाविरोधात अदानी समूहाचा पुनर्विकास प्रकल्प धारावीकरांवर लादण्यात आला आहे. या प्रकल्पाने मुंबईतील सुमारे २ हजार एकरची जागा अदानी बळकावणार असून धारावीकरांबरोबरच मुंबईकरांनाही याचा फटका बसणार आहे. या सर्वांना विरोध करण्यासाठी धारावी बचाव आंदोलन समितीच्या वतीने धारावीकरांमध्ये जनजागृती करण्यात येत असून विशाल जनसभा शिवराज मैदानावर होणार आहे. त्यानंतर मोठे आंदोलन जिल्हाधिकारी कार्यालयासमोर करण्यात येणार आहे. या सभेच्या पार्श्वभूमीवर, धारावी बचाव आंदोलनाच्या नेत्यांची आणि पदाधिकाऱ्यांची आज बैठक झाली. यावेळी आदित्य जाधव, विठ्ठल पवार, ॲडव्होकेट राजेंद्र कोरडे, उमेश कन्नाकुस, अब्दुल कलाम खान, जगन्नाथ भोसले, रहीम मोटारवाला, अबू खालीद, नसिरुद्दीन आदींसह राष्ट्रवादी, काँग्रेस, समाजवादी, शिवसेना, शेकाप अशा विविध पक्ष संघटनांचे प्रतिनिधीही उपस्थित होते.

### हिंमत असेल तर अपात्रांची यादी जाहीर करा!

आतापर्यंत ८० टक्के झोपड्यांचा सर्व्हे झाला असा गैरसमज अदानीची कंपनी धारावीकरांमध्ये पसरवत आहे. पण प्रत्यक्षात धारावीत दहा ते पंधरा टक्केसुद्धा सर्व्हे झालेला नाही. त्यात लोकांच्या या सर्व्हेला मोठा विरोध आहे. धारावीतील हजारो झोपडीधारकांना अदानीने अपात्र केले आहे. हिंमत असेल तर अदानी आणि सरकारने अपात्रांची यादी जाहीर करून दाखवावी. ही यादी जाहीर केली तर संपूर्ण धारावीत संतापाचा भडका उडेल, असा इशारा बाबुराव माने यांनी दिला.

The article discusses the opposition to Adani's redevelopment project in Dharavi and plans for a public meeting and protest against it. It mentions several leaders involved in organizing these protests.

Sakal • 15 Apr • Dharavi

# Opposition of Dharavikars to giving affidavit

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1 • PG | 203 • Sqcm | 134176 • AVE | 352.42K • Cir | Middle Center |

Mumbai



# प्रतिज्ञापत्र देण्यास धारावीकरांचा विरोध

## एक ते दोन हजार रुपयांचा रहिवाशांना बसतोय आर्थिक भुर्दंड

धारावी, ता. १४ (बातमीदार) : धारावी पुनर्विकास प्रकल्पांतर्गत अपात्र किंवा वरच्या मजल्यावरील रहिवाशांना धारावीबाहेर घरे देण्याची तरतूद आहे, मात्र वरच्या मजल्यावरील बहुतेक रहिवाशांकडे त्यांचे निवासस्थान सिद्ध करण्यासाठी अधिकृत नोंदी नाहीत. त्यामुळे संबंधितांकडून शपथपत्र घेतले जात असून, याला धारावीकरांनी विरोध दर्शवला आहे. आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत असल्याचे येथील रहिवाशांनी सांगितले.

धारावी पुनर्वसन प्रकल्पासाठी नवभारत कंपनीकडून मोठ्या प्रमाणावर घरांचा सर्व्हे केला जात आहे. त्यामुळे स्थानिक रहिवासी धावपळ करत आहेत. धारावी बचाव आंदोलनाकडून सर्व्हेला विरोध केला जात आहे. या सर्व घडामोडींमुळे रहिवाशांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. त्यातच आता घराच्या कागदपत्रांसोबत प्रतिज्ञापत्र बनवण्याचे काही लोकांनी सांगितल्याने असे प्रतिज्ञापत्र बनवण्यासाठी रहिवासी वांद्रे व अन्य न्यायालयात जाऊन असे प्रतिज्ञापत्र बनवत आहेत. यासाठी हजारो रुपये खर्च करत होते. यावर काही लोकांनी डोके लावून नोटरी करणाऱ्यांना धारावीतील वेगवेगळ्या विभागात आणून बसवण्यास सुरुवात केली आहे. या प्रतिज्ञापत्रांची मुळात गरज आहे का, असा सवाल जागरूक नागरिक व समाजसेवक विचारीत आहेत. राज्य सरकारने यावर खुलासा करावा, अशी मागणी होत आहे. भविष्यात नुकसान होऊ नये, यासाठी स्थानिक रहिवासी एक हजार ते दोन हजार रुपये खर्च करून प्रतिज्ञापत्र बनवत आहेत. यासाठी विभागात टेबल टाकून वकील मंडळी बसून आहेत. धारावीतील घर भाड्याने देऊन धारावीबाहेर राहण्यास गेलेले रहिवासी भीतीपोटी धारावीत येऊन असे प्रतिज्ञापत्र बनवून घेत आहेत. धारावीतील सर्वच घरांवर सर्व्हे क्रमांक टाकला जात आहे. घरांच्या माळ्यांचाही सर्व्हे केला जात असल्याने रहिवासी माळ्यावरील घर पात्र ठरावे, यासाठी प्रतिज्ञापत्र बनवत आहेत.

धारावी : धारावीतील अनेक विभागात नोटरी करणारे बसले आहेत.

हे प्रतिज्ञापत्र बनवण्याचे काम कायदेशीर नाही. याबद्दल सरकार अधिकृतपणे सांगत नसल्याने सगळा गोंधळ सुरू आहे. लोकही भीतीपोटी कुणीही काहीही सांगेल ते करत आहेत.
- ज्योती गायकवाड, स्थानिक आमदार.

Dharavi residents are forced to submit affidavits to prove eligibility for housing under the redevelopment project due to lack of official documents. This has caused confusion and financial strain. Locals are questioning the legality of on-the-spot affidavit setups, demanding government clarity as fear and misinformation spread across the community.

Dophar Ka Samana • 15 Apr • Dharavi

## Conflict will erupt in Dharavi!

| 3 • PG | 160 • Sqcm | 26420 • AVE | 198.08K • Cir | Middle Left |
|---|---|---|---|---|

Mumbai

# धारावी में भड़केगा संघर्ष!

## 20 अप्रैल को शिवराज मैदान में विशाल जनसभा

सामना संवाददाता / मुंबई

धारावी में पिछले कई वर्षों से रह रहे किसी भी निवासी को अपात्र न ठहराया जाए, यह 'धारावी बचाओ आंदोलन' की स्पष्ट और ठोस मांग है। लेकिन इसके विपरीत राज्य सरकार और अडानी की भूमिका नजर आ रही है। इसी मुद्दे को लेकर आगामी २० अप्रैल को धारावी में संघर्ष भड़कने की संभावना है। इसी दिन शाम को 'धारावी बचाओ आंदोलन' की ओर से शिवराज मैदान, क्रॉस रोड पर एक विशाल जनसभा का आयोजन किया गया है।



धारावी के पुनर्विकास के नाम पर धारावीवासियों को बेदखल किया जा रहा है, इस अन्याय को लेकर लोगों में गुस्सा सुलग रहा है। इस पृष्ठ भूमि में अडानी के खिलाफ जल्द ही मुंबई जिलाधिकारी कार्यालय के सामने एक बड़ा आंदोलन होने वाला है। उसी की पूर्व तैयारी के रूप में यह विशाल जनसभा आयोजित की जा रही है। इस जनसभा की तैयारी को लेकर सोमवार को 'धारावी बचाओ आंदोलन' के नेताओं और पदाधिकारियों की एक बैठक आयोजित की गई। इस बैठक में आदित्य जाधव, शिवसेना (उद्धव बालासाहेब ठाकरे) के विट्ठल पवार, एड. राजेंद्र कोरडे, उमेश कन्नाकुस, अब्दुल कलाम खान, जगन्नाथ भोसले, रहीम मोटारवाला, अबू खालिद, नसीरुद्दीन समेत राष्ट्रवादी कांग्रेस (शरदचंद्र पवार), कांग्रेस, समाजवादी पार्टी, शिवसेना (उद्धव बालासाहेब ठाकरे) जैसे विभिन्न राजनीतिक दलों और संगठनों के प्रतिनिधि मौजूद थे।



नेताओं का कहना है कि अगर अब धारावीवासी संघर्ष नहीं करेंगे तो अडानी उनकी मांगें कभी नहीं मानेगा। इसलिए अब नहीं तो कभी नहीं, इस आक्रामक भूमिका के साथ धारावीवासियों को आगे आना होगा। इसके लिए अडानी के खिलाफ एक मजबूत और बड़ा संघर्ष खड़ा करना होगा, तभी मांगें मानी जाएंगी। २० अप्रैल की सभा में भारी संख्या में लोगों की उपस्थिति होनी चाहिए, इसके लिए पूरी तैयारी करने के निर्देश धारावी बचाओ आंदोलन के नेता बाबूराव माने ने बैठक में दिए। इसके बाद कार्यकर्ताओं ने इस सभा में बड़ी भीड़ जुटाने का संकल्प लिया। धारावी में ८० प्रतिशत झोपड़ियों का सर्वेक्षण हो चुका है। इस तरह का भ्रम अडानी कंपनी द्वारा फैलाया जा रहा है। जबकि हकीकत यह है कि धारावी में केवल १० से १५ प्रतिशत ही सर्वेक्षण हुआ है। इस सर्वेक्षण का लोगों ने तीव्र विरोध किया है, ऐसा गंभीर आरोप बाबूराव माने ने लगाया।

A massive protest is brewing in Dharavi against the Adani redevelopment project. On April 20, Dharavi Bachao Andolan will hold a huge public meeting at Shivraj Maidan, demanding justice for long-time residents. Leaders allege forced evictions and false survey claims, urging mass resistance to protect Dharavi's future.

# Channel Overview

## Business Channel

No Coverage in this segment

## Hindi Channel

No Coverage in this segment

## English Channel

No Coverage in this segment

# Channel Overview

## Regional & Others Channel

| Total Clip | Top Channel |
|---|---|
| **1** | **Zee 24 Taas (1)** |

1. Zee 24 Taas 1

**Zee 24 Taas**
**Dharavi**




The Dharavi Rehabilitation Authority has sought affidavits for verification of residents of the upper floors. The authority h...

News • Marathi • 06:01 AM 15 Apr, 2025

## Online Coverage

| No | Portal Name | Headline (Incorporated with URL) | Reach |
|---|---|---|---|
| 1. | Msn | Dharavi Redevelopment Project : धारावी पुनर्विकास प्रकल्पाचा मास्टरप्लॅन लवकरच ह... | 733.9M |
| 2. | Indian Express | Dharavi project under scrutiny, a 'de-extinction", and Mehul Choksi"s arrest | 90.9M |
| 3. | Saamana | अदानीविरोधात धारावीकर एकवटणार, शिवराज मैदानावर 20 एप्रिलला जनसभा | 1.2M |
| 4. | Mh Live News | Dharavi Redevelopment Project : धारावी पुनर्विकास प्रकल्पाचा मास्टरप्लॅन लवकरच ह... | N/A |